WISMA
WEST INDIAN SUGAR MILLS ASSOCIATION

# विस्मा वार्तापत्र

वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन

• विस्मा वार्तापत्र • मे २०२४ • वर्ष : २ • अंक : ०८ • पाने : ४४ • (फक्त खाजगी वितरणासाठी)

## ग्रामीण आत्मनिर्भर भारतासाठी साखर उद्योगाचे योगदान

## अन्नदाता ते उर्जादाताचे जनक मा. ना. नितीनजी गडकरी यांची स्वप्नपूर्ती



» कृषिरत्न बी. बी. ठोंबरे – अध्यक्ष, वेस्ट इंडियन शुगर मिल्स् असोसिशएन (एनजीओ)

भारतातील साखर उद्योग देशातील दुसऱ्या क्रमांकाचा साखर उद्योग असून, त्याचे वैशिष्ट्य म्हणजे हा उद्योग १०० टक्के ग्रामीण भारतामध्ये उभारला गेला आहे. ग्रामीण रोजगार निर्मितीमध्ये या उद्योगाचा सिंहाचा वाटा असून ग्रामीण भारतात ५० लाखा पेक्षा जास्त लोकांसाठी रोजगार निर्माण केलेला आहे. साखर उद्योग ग्रामीण भागात उभारला गेल्याने प्रत्येक साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील जवळपास २५० ते ३०० गावां मधील सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा या उद्योगाचे माध्यमातून सरकारचे मदती शिवाय अत्यंत उत्कृष्ट दर्जाची उपलब्ध झालेली आहे. त्या माध्यमातून प्रामुख्याने दळणवळणाची साधने, रस्ते, शैक्षणीक व आरोग्य सुविधा त्याच बरोबर जल व मृद संधारण इत्यादी क्षेत्रामध्ये साखर उद्योगाने गेल्या ७५ वर्षात भरीव कामगिरी केलेली आहे.

खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर भारत ही संकल्पना साखर उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण भारतात व प्रामुख्याने महाराष्ट्रात सहकार चळवळीचे माध्यमातून राबवणेस १९४८ साली देशातील पहिला सहकारी तत्त्वावरील साखर कारखाना प्रवरा सहकारी साखर कारखाना सुरू करून त्यावेळचे दृष्टे सहकार नेते मा. धनंजयजी गाडगीळ, वैकुंठभाई मेहता व विठ्ठलराव विखे पाटील यांच्या मुळे झाली. आज देशात ५५० साखर कारखाने कार्यान्वीत असून त्यातील २२५ साखर कारखाने महाराष्ट्रात कार्यान्वीत आहेत. देशातील साडेपाच कोटी ऊस उत्पादक शेतकरी या उद्योगाशी जोडलेले असून ग्रामीण अर्थकारणाचा कणा असणारे ऊस पीक हे एकमेव शेतकऱ्याला हमीने पैसे मिळवून देणारे व किमान आधारभूत किंमत देवून शेतकऱ्यांच्या जीवना मध्ये खऱ्या अर्थाने आर्थिक क्रांती करणारे ऊस पीक आहे. देशाच्या कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक घटकाचा अभ्यास करता आपल्या हे लक्षात येते की, फक्त आणि फक्त ऊस उत्पादक शेतकरीच आर्थिक दृष्टया सबल असून स्थिरावला आहे व त्यास किमान उत्पादन खर्चा पेक्षा अधिक उत्पन्न मिळत आहे. ईतर कोणत्याही नगदी पिका पेक्षा ऊस हे एकमेव पीक शेतक-यांच्या जीवना मध्ये आर्थिक स्थैर्य देवून त्यास वरदान ठरलेले आहे.

भारताचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी नुकतीच आत्मनिर्भर भारत ही संकल्पना जगा समोर मांडून प्रत्येक क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याचे आव्हान त्यांनी केलेले आहे. त्या अनुषंगाने साखर उद्योग हा नुसता आत्मनिर्भरच नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा व ग्रामीण रोजगार निर्मितीचा मुख्य स्त्रोत आहे. साडेपाच कोटी ऊस उत्पादकां बरोबरच ५० लाख शेतमजूर व कर्मचारी या उद्योगाचे माध्यमातून स्वावलंबी होवून आत्मनिर्भर झालेली आहेत. साखर उद्योग हा १०० टक्के देशी तंत्रज्ञानावर व देशांतर्गत उत्पादीत

यंत्रसामुग्रीवर चालतो. एवढेच नव्हेतर अनेक देशांना साखर उद्योगाचे तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री भारतीयांकडून निर्यात केली जाते. साखर उत्पादन व खपाचे बाबतीत ही आम्ही गेल्या अनेक वर्षा पासून स्वावलंबी आहोत एवढेच नव्हे तर दर वर्षी ८० ते १०० लाख टन साखर अनेक देशांना निर्यात केली जाते. त्यामुळे साखर उत्पादनात आत्मनिर्भरता ठेवून देशासाठी परकीय चलन मिळवून देण्याचे ही कार्य या उद्योगा मार्फत केले जाते.

**आजचा अन्नदाता हा उद्याचा उर्जादाता मा. नितीनजी गडकरींची स्वप्नपूर्ती– जैवीक इंधन (बायोफ्युअल) निर्मिती**

साखर उद्योगाचा संशोधनात्मक विकास हा गेल्या अनेक वर्षा पासून चालु आहे. मात्र गेल्या दशका पर्यंत शासनकर्त्यांच्या निष्क्रीयतेमुळे या क्षेत्रामध्ये फारसे संशोधन व त्याची अंमलबजावणी होवू शकली नाही मात्र २०१४ साली मा. नरेंद्रजी मोदी यांनी देशाचा कारभार स्वीकारल्या पासून व संपूर्ण देश खऱ्या अर्थाने स्वावलंबी व आत्मनिर्भर करणेचे दृष्टीने मूलभूत बाबींवर लक्ष केंद्रीत करून अनेक धोरणात्मक बदल केले. प्रामुख्याने मा.नितीन गडकरीजींच्या दिव्यदृष्टीतून अथक प्रयत्नातून अत्यंत महत्वाचा व खऱ्या अर्थाने देश आत्मनिर्भर व स्वावलंबी करण्याचा मार्ग म्हणजे इंधनाची आयात कमी करणे व त्यासाठी देशांतर्गत उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्ती पासून पुनर्निर्मीत उर्जा व इंधन निर्माण करणे हा होय. त्यादृष्टीने मा. नितीनजी गडकरी यांनी साखर उद्योगातून बाहेर पडणारे टाकावू उपपदार्थ जसे मोलासेस, बगॅस (भूस्सा), प्रेसमड ईत्यादी पासून जैवीक इंधन व पुनर्निर्मीत उर्जा निर्मितीसाठी धोरणात्मक बदल करून मोठ्या प्रमाणात साखर उद्योगाला प्रोत्साहन दिले. साखर उद्योगा वरील अनेक जाचक व अवाजवी नियंत्रणे व बंधने उठवून उद्योग स्पर्धात्मक दृष्टया मुक्त करून सक्षम केला. त्यामुळे आज देशा मध्ये जे पेट्रोल विकले जाते त्या पेट्रोल मध्ये १२ टक्के कारखान्यातील मोलासेस पासून उत्पादीत केलेले ईथेनॉल मिसळले जाते. ईथेनॉल हे जैवीक इंधन असून पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत पर्यावरणपूरक आहे, त्यापासून कसलेही प्रदुषण होत नाही. तसेच ईथेनॉल है पुनर्निर्मीत इंधन शेती उत्पादना पासून म्हणजे ऊसापासून निर्माण होते त्यामुळे ते हरीत इंधन या संकल्पने खाली अत्यंत पर्यावरण पूरक आहे. तसेच कृषी क्षेत्राला प्रोत्साहन देवून कृषीक्षेत्र आर्थिकदृष्ट्या सक्षम व आत्मनिर्भर करणारे आहे.

तसेच केंद्र सरकारने साखर कारखान्यातील मोलासेस पासूनच नव्हेतर बी–हेवी मोलासेस व ऊसाच्या रसा पासून थेट ईथेनॉल करण्याची साखर उद्योगाची अनेक वर्षा पासूनची मागणीही मान्य करून परवानगी दिलेली आहे. त्यामुळे ख–या अथनि साखर उद्योगाचे परिवर्तन होवून नवीन अनेक सी निर्माण झालेल्या आहेत. आत्तापर्यंत साखर उद्योग फक्त साखर उत्पादनासाठीच गनला जात असे यापुढे साखर हे उपपदार्थ व ईथेनॉल, वीज, बायो सीएनजी हे मुख्य उत्पादन, साखर उद्योग व ऊस उत्पादक शेतकरी आर्थिकदृष्टया अत्यंत सक्षम व आत्मनिर्भर होईल यात मुळीच शंका नाही. गा घडीस १२ टक्के ईथेनॉल पेट्रोल मध्ये मिश्रणाची परवानगी देवून केंद्र शासनाने जवळपास ७५ हजार कोटी रूपये किंमतीची क्रुडतेल आयात कमी करून परकीय चलन वाचवलेले आहे हे ईथेनॉल मिश्रणाचे प्रमाण २०२५ पर्यंत २० टक्के करण्याचे दीर्घकालीन धोरण जाहीर करून त्या प्रमाणात ईथेनॉल व जैव इंधन उत्पादन क्षमता वाढवणेसाठी १८ हजार कोटी रूपयांचे पॅकेजही जाहीर केलेले आहे. इथेनॉल निर्मिती बरोबरच कारखान्यातील भुस्यापासून मोठ्या प्रमाणावर वीज निर्मीती जी पर्यावरण दृष्टया अत्यंत पुरक असून पुनर्निर्मीत संसाधना पासून निर्माण केली जाते. त्यामूळे कोळश्यापासून प्रदूषणयुक्त वीज निर्मितीला पर्याय मिळालेला आहे. तसेच कारखान्यातील सांडपाणी, डिस्टीलरी प्रकल्पातील सांडपाणी (स्पेन्टवॉश) व प्रेसमड ईत्यादी पासून बायोगॅस व त्यापासून बायो-सीएनजी हे जैव इंधनही निर्मितीस मोठ्या प्रमाणात प्रोत्साहान देवून सीएनजीची आयात कमी करून परकीय चलन वाचवून देश सर्व प्रकारच्या इंधनासाठी स्वावलंबी आत्मनिर्भर करण्याच्या मा. पंतप्रधानांच्या संकल्पनेला साखर उद्योगाचा मोठा हातभार लागतो आहे व त्यात मा. नितीनजी गडकरी साहेबांचे योगदान लाख मोलाचे आहे. साखर उद्योग हा ग्रामीण अर्थकारणाचा कणा आहे, उस पीक हे शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचे व आत्मनिर्भरतेचे प्रमूख नगदी पीक आहे व त्यावर प्रक्रिया करणारा देशातील १ साखर उद्योग हा आता साखर उप-पदार्थ व जैविक इंधन / इथेनॉल व उर्जा हे मूख्य उत्पादन अशा संकल्पनेतून ग्राम ीण भारत आत्मनिर्भर करण्यात सिंहाचा वाटा उचलतो आहे.

भ्रमणध्वनी : ७५८८८७७७००



## ❋ विस्मा कार्यकारी मंडळ सदस्य ❋

१) श्री. बी. बी. ठोंबरे – अध्यक्ष
२) श्री. रोहित पवार – उपाध्यक्ष
३) डॉ. पांडुरंग राऊत – महासचिव
४) श्री. माधवराव घाटगे – सदस्य
५) श्री. महेश देशमुख – सदस्य
६) श्री. रणजित मुळे – सदस्य
७) श्री. यशवर्धन डहाके – सदस्य
८) श्री. बजरंग सोनवणे – सदस्य
९) श्री. योगेश पाटील – सदस्य
१०) डॉ. समय बनसोड – सदस्य
११) श्री. रोहित नारा – सदस्य
१२) श्री. हरीभाऊ बागडे – मानद सदस्य
१३) श्री. रवी गुप्ता – मानद सदस्य
१४) श्री. संजय शिंदे – स्विकृत सदस्य

# * अनुक्रमणिका *


| | | |
|---|---|---|
| १ | अन्नदाता ते उर्जादाताचे जनक : मा. ना. नितीनजी गडकरी यांची स्वप्नपूर्ती | १ |
| २ | Increased demand for ethanol will change the Agro-economy of country: Nitin Gadkari | ६ |
| ३ | ऐन उन्हाळ्यात साखर कारखान्यांचा शेतकऱ्यांना दिलासा: किती दिली एफआरपी? | ७ |
| ४ | राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत ऊस तोडणी यंत्रास अनुदान प्रकल्पास सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मुदतवाढ देण्याबाबत : महाराष्ट्र शासन, सहकार विभाग शासन निर्णय. | ८ |
| ५ | राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत ऊस तोडणी यंत्रासाठी कर्ज अनुदान प्रक्रियेबाबत - साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य परिपत्रक | ९ |
| ६ | ऊस तोडणी यंत्र कर्ज सुलभ करण्याच्या सुचना | ११ |
| ७ | बँकांनी अडवली ऊस तोडणी यंत्रे. | १२ |
| ८ | इथेनॉलमध्ये अडकलेले अकराशे कोटी मिळणार. | १३ |
| ९ | देशाभरात तब्बल २३०० कोटींचे मोलॅसिस, इथेनॉल शिल्लक. | १४ |
| १० | ISMAच्या महासंचालकांशी उसाचे उत्पादन आणि आर्थिक स्थिरता वाढविण्यासाठी सरकार - उदयोगाच्या सहकार्यावर चर्चा. | १५ |
| ११ | साखरेचे ज्युट पॅकिंग केवळ सात टक्के कारखान्यांकडूनच. | १७ |
| १२ | पॅकिंगच्या सक्तीतून साखर वगळा. | १८ |
| १३ | हरित हायड्रोजन वरील 'एसटी' ला मिळणार अनुदान. | १९ |
| १४ | देशात ११० लाख टन साखर उत्पादनासह महाराष्ट्र अव्वल. | २० |
| १५ | साठेबाजांमुळे साखर दर चढेच राहणार ! | २१ |
| १६ | WTO विवाद : भारत ने अपनी चीनी सब्सिडी पर डब्ल्यूटीओ की सीमा का उल्लंघन करने के आरोपों को खारिज किया. | २२ |
| १७ | सरकारकडून जादा साखर विक्री करणाऱ्या ६३ कारखान्यांच्या जून महिन्याच्या साखर कोट्यात कपात | २३ |
| १८ | विस्मा-राज्यस्तरीय त्रिपक्षीय लवादाने ऊस तोडणी दरवाढ मिनी ट्रॅक्टर /छकडा गाडा/अंगद गाडा इत्यादींना लागू करणेबाबत. | २४ |
| १९ | कारखान्यावर ऊस वाहतुकीसाठी वापरात असलेल्या अंगद गाड्या (मिनी ट्रॅक्टर, जुगाड) यांच्या वाहतूक दराबाबत. | २६ |
| 20 | शुगर फैक्ट्री में अब बनेगा मिनरल वॉटर, नाम होगा गन्ना जल, ब्रांड के साथ बडे पैमाने पर लॉन्च की तैयारी. | २८ |
| 21 | Every rupee invested in agri research yields Rs. 13.85 : NIAP | 29 |
| 22 | Thailand's sugar production expected to increase to 10.2 MMT in 2024-25: USDA. | 30 |
| 23 | Govt. hosts workshop on green hydrogen standards, launches dedicated portal. | 31 |
| 24 | India's renewable energy secretary showcases green hydrogen leadership at World Hydrogen Summit 2024. | 32 |
| 25 | Sugarcane crushing season ends in Maharashtra. | 33 |
| 26 | Brazil, Canada, EU urge India to submit timely notifications on sugar subsidies in WTO. | 34 |
| 27 | India - State wise Crushing Report for the Sugar Season 2023-24- Dt. 31/05/2024. | 35 |
| 28 | Maharashtra State Crushing Final Report for Sugar Season – 2023-24. (Dt. 15/05/2024.) | 36 |
| 29 | ISMA – Weekly – Domestic Sugar Review. | 37 |
| 30 | New York No. 11 of Raw Sugar | 38 |
| 31 | London Daily Price White Sugar | 39 |
| 32 | World Sugar Market Trends Graph. | 40 |
| 33 | Monthly Sugar Quota for Sale in June -2024. | 43 |

# वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (एन.जी.ओ.) पुणे.

## कार्यक्षेत्र–महाराष्ट्र, गुजरात व गोवा राज्य.

* खाजगी व सार्वजनिक साखर कारखान्यांच्या विकास, उद्योगशिलता व ऊस पिक संवर्धनाकरिता कामकाज करणे.
* सभासद कारखान्यांच्या समस्या व अडचणी याबाबत राज्यांचे साखर आयुक्त, राज्य शासन, मुख्यमंत्री व संबंधित विषयांचे मंत्री यांच्याकडे मांडणीकरून मार्ग काढणे.
* राष्ट्रीय पातळीवरील संस्था व केंद्र शासन यांच्याशी समन्वय साधून साखर उद्योग, ऊस पिक याबाबतच्या अडचणी दूर करणे व संवर्धन करणे.
* सभासद कारखान्यांना यंत्रसामुग्री, साखर, उपपदार्थ, सहवीज, व्यवस्थापन, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विपणन, वित्तविषयक तसेच शेतकऱ्यांना ऊस व आंतरपिके, शेती निवीष्ठा यामधील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करणे.
* भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे विविध उपक्रम, परिपत्रके नुसार कार्यक्रमामध्ये स्वत: व सभासद कारखान्यांना सहभागी करून उद्योग व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे.

विस्मा मासिक वार्तापत्र ऑक्टोबर–२०२२ पासुन सुरू केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने राज्य व केंद्र शासनाचे आदेश व परिपत्रके, राज्यस्तरीय व देशपातळीवरील नामांकित मराठी/इंग्रजी वृत्तपत्रांमधील साखर/उपपदार्थ बाबतच्या बातम्यांची कात्रणे, उदयोगामधील नव–नवीन संशोधन, सभासद कारखान्यांनी राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, कच्च्या साखरेचे आंतरराष्ट्रीय दर (International Sugar Market- New York Raw Sugar Prices), पांढऱ्या साखरेचे लंडन बाजारातील भविष्यातील बाजारभाव (London Future Price of White Sugar), देशातील इथेनॉल मिश्रणाची राज्यनिहाय सध्यस्थितीमधील टक्केवारी (Ethanol Supply Position), मागील चार आठवडयातील कारखानास्तरावरील साखरेच्या दराची सरासरी (Trend of Average Ex-Mill Sugar Price for the last 4 weeks), भारतातील प्रमुख चार मोठ्या शहरांतील घाऊक साखरेचे दर (Wholesale Price of Sugar in 4 Metropolitan Cities in India) साखर उदयोगामधील/विस्माचे (सेमिनार) चर्चासत्रे, तंज्ञाचे माहितीपूर्ण लेख इत्यादी साखर उदयोगाकरीता अत्यावश्यक असणाऱ्या अत्यंत महत्वाच्या बाबींचा समावेश केला जातो. सदर वार्तापत्राची सॉफ्ट कॉपी विस्मा कार्यालयामार्फत राज्यातील सर्व खाजगी व सहकारी साखर कारखान्यांना ईमेलद्वारे व सभासदांना छापील प्रत पोष्टाने प्रत्येक महिन्याला पाठविली जाते.


## West Indian Sugar Mills Association

Ground Floor, Sakhar Sankul, Shivajinagar, Pune-411 005. Tel- 020- 25511399,
Email- wisma.pune@gmail.com / edwisma.pune@gmail.com Website -www.wisma.in

**Editor :**
**Ajit Chougule**
**Executive Director**
**West Indian Sugar Mills Association**

**Layout & Printing :**
**Bhalchandra Kulkarni**
**(Ekvira Publicity, Pune)**
**Mob : 98228 82509**